महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
**समग्र शिक्षा**
**महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई**

जा. क्र. मप्राशिप/सशि/PA&CC/२०२३-२४/2542 दिनांक : - 8 SEP 2023

प्रति,
१) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
२) मा. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).

विषय : स्टार्स् प्रकल्पांतर्गत राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता ९ वी ते १२ वी मधील २.०५ लाख मुलांची Psychometric Assessment and Career Counselling ची अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ : १) पुरवठा आदेश क्र. GEMC- ५११६८७७२३२७२६८२, दि. १८/०३/२०२३.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. मप्राशिप/STARS/प्रकल्प/Psychometric/ २०२३-२४/१३३७, दि. ०३/०५/२०२३.

महोदय,

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक (इ. ९वी-१०वी आणि इ. ११वी-१२वी) शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील शिक्षण आणि करिअरबद्दल अनेक प्रश्न असतात. इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना मोफत व गुणवत्तापूर्ण करिअर मार्गदर्शन देण्यासाठी सन २०१६ पासून महाराष्ट्र शासनाने 'कल चाचणी' (अभियोग्यता चाचणी) हा प्रकल्प राबवून करिअर मार्गदर्शन कार्यक्रम सुरू केला आहे. या व्यतिरिक्त समुपदेशकांच्या क्षमता वाढीसाठी विविध समुपदेशन कार्यशाळा समग्र शिक्षा योजनेंतर्गत घेण्यात आल्या आहेत. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमध्ये काम करणाऱ्या समुपदेशकांच्या मदतीने जिल्हा स्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शनाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. करिअर मार्गदर्शन आणि समुपदेशनाबाबत महाराष्ट्रात अनेक उपक्रम होत असले, तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याची आणि संरचित सायकोमेट्रिक चाचण्या, मूल्यांकन आणि वैयक्तिक समुपदेशन विकसित करण्याची गरज आहे.



**जवाहर बाल भवन, पहिला मजला, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड (प.), मुंबई - ४०० ००४.**
टेलिफोन नं. : ०२२-२३६३ ६३१४, २३६७ ९२६७, २३६७ १८०८, २३६७ १८०९, २३६७ ९२७४
ई-मेल : mpspmah@gmail.com, samagra-shiksha@mahedu.gov.in
संकेतस्थळ - https://samagrashiksha.maharashtra.gov.in, https://mpsp.maharashtra.gov.in

२१ व्या शतकात प्रत्येक क्षेत्रात करिअरच्या अमर्याद संधी आहेत. सायकोमेट्रिक मूल्यांकन आणि करिअर समुपदेशन विद्यार्थ्यांना त्यांच्या महत्त्वाकांक्षा, त्यांच्या आवडी आणि क्षमतेनुसार विचारपूर्वक निर्णय घेण्यास करिअरची दिशा निवडण्यास व जीवनात पुढे जाण्याचा मार्ग स्पष्ट करण्यास मदत होईल.

स्टार्स् प्रकल्पांतर्गत राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता ९ वी ते १२ वी मधील २.०५ लाख मुलांची Psychometric Assessment and Career Counselling करण्याकरिता प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीच्या इतिवृत्तात भारत सरकारने सन २०२३-२४ करिता तरतूद मंजूर केली आहे.

या Psychometric Assessment and Career Counselling या उपक्रमामध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी सायकोमेट्रिक हेल्पलाइन तयार करणे, मुलांसाठी सायकोमेट्रिक चाचणी, त्यांच्या आकांक्षांशी जुळणारे करिअर मार्ग निवडण्यास त्यांना सहाय्य करणे, त्यासाठी प्रशिक्षित करिअर समुपदेशकांचे मार्गदर्शन करणे इ. चा त्यात समावेश असेल. यामध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत अविरत प्रशिक्षणाद्वारे प्रशिक्षित करण्यात आलेल्या माध्यमिक शाळांमधील ४०,००० शिक्षक व मुख्याध्यापकांना व शिक्षक समुपदेशकांना सहभागी करण्यात येईल.

याबाबतची आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करून ई-निविदा प्रक्रियेद्वारे M/s. Emango Education Private Limited यांची पुरवठाधारक म्हणून निवड करण्यात आली असून त्यांना याकामी संदर्भीय क्र. १ द्वारे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर उपक्रमाची दिनांक ३१/०३/२०२४ पर्यंत अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भ क्र. २ नुसार पुरवठादारास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. पुरवठाधारकास या प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या Scope of Work ची प्रत सोबत जोडली आहे.

सबब, M/s. Emango Education Private Limited या पुरवठादाराकडून करण्यात येणाऱ्या Psychometric Assessment and Career Counselling प्रकल्पाच्या अंमलबजावणी बाबत आपणांस पुढील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत-

➢ **Psychometric Assessment आणि Career Counselling पूर्ण करण्यासाठी पुढील प्रक्रिया अवलंबावी लागेल -**

टप्पा १ : सर्व विद्यार्थ्यांचे Career Counselling पूर्ण होईपर्यंत शाळेने ५ dedicated resources (शालेय शिक्षक/समुपदेशक) उपलब्ध करणे आवश्यक आहे (त्यांच्याकडे स्मार्ट मोबाइल फोन असणे आवश्यक आहे). Dedicated resources (शालेय शिक्षक/समुपदेशक) यांचे संपर्क तपशील शाळांनी उपलब्ध करणे व पोर्टलवर Update करणे.

टप्पा २ : शाळेच्या डॅशबोर्डवर Login करून विद्यार्थ्यांच्या तपशीलाची (नाव, मोबाईल क्रमांक, वर्ग) पडताळणी करणे.

टप्पा ३ : विद्यार्थ्यांच्या तपशीलांची पडताळणी झाल्यानंतर ते Psychometric Assessment देण्यासाठी आणि Career Counselling करण्यासाठी पोर्टलवर Login करणे.

टप्पा ४: शाळेच्या वेळेत, शाळेतील संगणक प्रयोगशाळेतील संगणकाचा वापर करून विद्यार्थ्यांची Psychometric Assessment करता येईल. जर शाळेत संगणक प्रयोगशाळा नसेल तर विद्यार्थ्यांची Dedicated resources (शालेय शिक्षक / समुपदेशक) यांच्या मोबाईल फोनद्वारे Psychometric Assessment पूर्ण करणे.

टप्पा ५: शाळेच्या वेळेत Dedicated resources (शालेय शिक्षक / समुपदेशक) यांच्या मोबाईलद्वारे Career Counselors त्यांच्याशी संपर्क करून विद्यार्थ्यांचे Career Counselling करणे.

टप्पा ६: शालेय वेळेनंतर: विद्यार्थ्यांचा / पालकांचा मोबाईल फोन वापरून शालेय वेळेनंतर Psychometric Assessment देता येईल आणि शाळेच्या वेळेनंतर Career Counselling सत्राचा स्लॉट देखील नोंदणी करणे. नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर नोंद केलेल्या स्लॉट दरम्यान विद्यार्थ्यांचे फोनद्वारे Career Counselling पूर्ण करणे.

**महत्त्वाचे :** विद्यार्थी आणि पालक या कॉल दरम्यान एकत्र असणे आवश्यक आहे.

टप्पा ७: एकदा सर्व विद्यार्थ्यांचे Career Counselling पूर्ण झाल्यावर, शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळेच्या डॅशबोर्डवर Login करून त्याची साप्ताहिक माहिती पोर्टलवर अद्ययावत करणे.

- **विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या बाबी :**
  - **विद्यार्थ्यांनी कसे Login करायचे :**
    - विद्यार्थ्यांना त्यांचा SARAL ID आणि Password (त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल नंबरवर शेअर केलेला) वापरून Login करणे.

      **टीप:** जर विद्यार्थी/पालकांकडे त्यांच्या प्रोफाइलमध्ये नमूद केलेला नोंदणीकृत मोबाईल क्रमांक नसेल तर मुख्याध्यापकांद्वारे त्यांचा मोबाईल क्रमांक अद्ययावत करू शकतात (शाळेच्या डॅशबोर्डचा वापर करून अपडेट केले जाऊ शकतात).
  - **विद्यार्थ्यांना Login करण्यास अडचणी येत असल्यास :**
    - **Login तपशील SMS वर प्राप्त न झाल्यास:**

      अ) विद्यार्थ्यांना त्यांचा SARAL ID माहित नसल्यास किंवा त्यांच्या मोबाइलवर त्यांचा SARAL ID आणि Password प्राप्त न झाल्यास विद्यार्थ्यांना शाळेशी संपर्क साधावा लागेल आणि त्यांचा SARAL ID विचारावा लागेल आणि त्यांच्या प्रोफाइलमध्ये अपडेट केलेला मोबाइल नंबर बरोबर आहे की नाही

हे तपासावे लागेल. मोबाईल नंबर बरोबर नसल्यास विद्यार्थ्यांना तो दुरुस्त करून घेणे (वर नमूद केल्याप्रमाणे तो शाळेच्या डॅशबोर्डद्वारे अपडेट केला जाऊ शकतो).

ब) विद्यार्थ्यांकडे त्यांचा SARAL ID असेल त्यांचा मोबाईल नंबर अपडेट होईल. Forget Password क्लिक करून ते त्यांचा पासवर्ड reset करू शकतात: (पालक/विद्यार्थ्याच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर नवीन पासवर्ड पाठवला जाईल)

- जर विद्यार्थी अजूनही Login करू शकत नसतील तर ते हेल्प डेस्कला कनेक्ट करू शकतात: ०८०६९३८७९४७.

- Psychometric Assessment कसे करता येईल आणि Career Counselling सत्र कसे नोंदवता येईल :

  अ) Psychometric Assessment कसे करता येईल :

  - **On the main student dashboard >click Psychometric Assessment >Click Start test >** वेळेत test पूर्ण करणे.

  ब) Career Counselling सत्र कसे नोंदवता येईल :

  - विद्यार्थ्याने Psychometric Assessment पूर्ण केल्यावर, त्यांच्याकडे एक Career Counselling स्लॉट निवडण्याचा पर्याय असेल, ते स्लॉटची उपलब्धता आणि त्यांची पसंती यावर आधारित बुक करू शकतात.

➢ <u>शाळेसाठी महत्त्वाच्या बाबी</u> :

अ) सर्व विद्यार्थ्यांचे तपशील तपासणे / अद्ययावत करणे (Within 2 days for receiving of notification received via Welcome SMS & email).

ब) त्यांच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी Psychometric Assessment पूर्ण केल्याची खात्री करणे आणि त्यांचे Career Counselling स्लॉटची नोंदणी करणे (within 10 days of revving the first message).

क) विद्यार्थ्यांनी त्यांचे समुपदेशन सत्र पूर्ण केल्यावर पडताळणी करणे. (Immediately after completion of psychometric assessment of all students)

- शाळेच्या डॅशबोर्डवर Login कसे करायचे :
  - शाळांनी www.maharashtracareerportal.com वर जाऊन Login करावे लागेल. > Click Schools login> Enter UDISE code & Password.
  - UDISE Code आणि Password आधीपासून मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या नोंदणीकृत मोबाइल नंबरवर आणि ई-मेल आयडीवर उपलब्ध करून देण्यात आला आहे.
- शाळांना Login करण्यास अडचणी येत असल्यास :
  - **click school login > click forget password > Enter UDISE CODE >** नोंदणीकृत ई-मेल आयडी आणि मुख्याध्यापकांच्या मोबाईल क्रमांकावर नवीन पासवर्ड पाठवला जाईल.
  - वरील पद्धतीचा वापर करून शाळा अजूनही लॉगिन करू शकत नसल्यास हेल्पडेस्कवर ०८०६९३८७९४९ या क्रमांकावर कॉल करा किंवा Principal.Support@maharashtracareerportal.com या ई-मेलवर ई-मेल करा.

- **विद्यार्थी तपशीलाची तपासणी / दुरूस्ती करण्याबाबत माहिती :**
  - प्रत्येक शाळेतील इयत्ता ९ वी ते १२ वी मध्ये शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे प्रोफाइल आधीच तयार करून शाळांशी जोडलेले आहेत. शाळांना विद्यार्थ्यांचे तपशील पडताळावे लागतील (जसे की, विद्यार्थ्यांचे नाव, वर्ग, विद्यार्थ्यांचा/पालकांचा मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडी (ई-मेल आयडी उपलब्ध असल्यास).
  - **विद्यार्थ्यांचे तपशील कसे पडताळायचे:**

    शाळेच्या डॅशबोर्डवर लॉग इन करा > Click verify students button on main page > ज्या विद्यार्थ्यांची माहिती शाळा पडताळू इच्छित आहे ते निवडा > click "go to verify" button > नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर आणि मुख्याध्यापकांच्या ई-मेल आयडीवर प्राप्त OTP प्रविष्ट करणे.

    **टीप** : जर या यादीत विद्यार्थी नसतील तर शाळेकडे पडताळणीसाठी प्रलंबित विद्यार्थी नाहीत.
  - मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांचे कोणतेही तपशील जसे की, मोबाईल नंबर / पालक मोबाईल नंबर / वर्ग / ई-मेल आयडी अद्ययावत करायचे असतील. त्याकरिता शाळेच्या डॅशबोर्डवर Login करणे > Click My School Students > All Students > A list of students is seen > Click the three vertical dots.
- **विद्यार्थ्यांचे Psychometric Assessment आणि Career Counselling पूर्ण झाल्यावर पडताळणी करणे :**
  - एकदा विद्यार्थ्यांचे Psychometric Assessment आणि Career Counselling पूर्ण झाल्यानंतर, मुख्याध्यापकांनी शाळेच्या डॅशबोर्डवरून त्याची पडताळणी करणे आवश्यक आहे.

- पडताळणी करण्यासाठी : शाळेच्या मुख्य डॅशबोर्डवर जाणे > Click verify counseling > select the students > click go to verify > (एक पत्र आपोआप तयार होईल ज्यामध्ये त्यांचे Career Counselling पूर्ण केलेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या नमूद केली जाईल, ज्याची ई-पडताळणी करणे आवश्यक आहे. OTP द्वारे) > click verify > enter the OTP (नोंदणीकृत मोबाइल नंबर आणि मुख्याध्यापकांच्या ई-मेल आयडीवर प्राप्त).

- **प्रशिक्षक कसे तपासायचे (शिक्षकांचे तपशील)**
  - प्रशिक्षणाची स्थिती तपासण्यासाठी शाळेच्या डॅशबोर्डवर Login करणे > Click my School Trainer

पुरवठादारामार्फत समुपदेशन हेल्पलाईन उपलब्ध करून देण्यात आली असून या संदर्भातील अडचणींबाबत खालील हेल्पलाईनवर संपर्क साधता येईल-

- विद्यार्थ्यांसाठी : ०८०६९३८७९४७
- मुख्याध्यापक /·प्राचार्यांसाठी : ०८०६९३८७९४९
- प्रशिक्षकांसाठी : ०८०६९३८७९४८

उपरोक्त प्रमाणे नमूद केल्यानुसार Psychometric Assessment and Career Counselling कार्यक्रमाची शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये यशस्वीपणे अंमलबजावणी होईल याची दक्षता घेण्यात यावी. तसेच, प्रकल्पाच्या यशस्वी व कालबद्ध अंमलबजावणीकरीता पुरवठाधारकास सर्वतोपरी मदत आपल्या स्तरावरुन करण्यात यावी व आपल्या अधिनस्त गट शिक्षणाधिकारी, समन्वयक, गट/शहर साधन केंद्रे तसेच, संबंधित शाळांचे मुख्याध्यापक यांना आवश्यक सूचना व मार्गदर्शन आपल्या स्तरावरुन करण्यात यावे.

कोणत्याही परिस्थितीत या प्रकल्पाची अंमलबजावणी या आर्थिक वर्षात पूर्ण करण्याच्यादृष्टीने आवश्यक नियोजन व दक्षता बाळगण्यात यावी.

आपला विश्वासू,

(समीर सावंत)
राज्य प्रकल्प समन्वयक तथा
सहसंचालक (प्रशा.)
म.प्रा.शि.प., मुंबई.

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रत : माहितीस्तव सविनय सादर,
मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत : माहितीस्तव,
१) मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

प्रत : माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
१) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व).
२) शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी/शिक्षण प्रमुख, महानगरपालिका (सर्व).
३) मुख्याधिकारी, नगर परिषदा (सर्व).
४) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व).
५) समन्वयक, गट/शहर साधन केंद्र (सर्व).
६) **M/s. Emango Education Private Limited.**